# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 14/09/2023 (गुरूवार) सायंकाळ

---

## रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांवर कारवाई

**पो.स्टे. कळमेश्वर** :— अंतर्गत ०१ किमी अंतरावर ब्राम्हणी शिवार येथे दिनांक १३/०९/२०२३ चे १७.०० वा. दरम्यान पोलीस स्टेशन कळमेश्वर येथील स्टाफ हे पोलीस स्टेशन कळमेश्वर हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना त्यांना ट्रॅक्टर क्र. एम.एच. २९ ए. के .०५३७ मध्ये अवैधरित्या रेती चोरी करतांनी मिळुन आले. ट्रॅक्टर क्र. एम. एच. २९ ए.के .०५३७ मध्ये आरोपी नामे— १) कैलास संतलाल परतेकी, वय २४ वर्ष, रा. ब्राम्हणी बस स्टॉप कळमेश्वर हा विना रॉयल्टी विना नंबर असलेल्या ट्रॉली मध्ये अवैध्यरीत्या विनापरवाना रेती वाहतुक करतांना मिळुन आल्याने त्यास ट्रॅक्टर व रेती बाबत विचारले असता ट्रॅक्टर हा २) राजु रामाजी डाखोळे, वय २९ वर्ष रा. हुडको कॉलोनी, शिव मंदिर जवळ कळमेश्वर यांच्या सांगणे वरून विना रॉयल्टी रेती घेवुन जात असतांना मिळुन आल्याने आरोपीतांकडुन ट्रॅक्टर ट्रॉली एम. एच. २९ ए.के. ०५३७ किंमती ५,०००००/—रूपये व १ ब्रास रेती किंमती ६०००/—रू असा एकुण ५,०६,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी कळमेश्वर पोलीसांनी, पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीतांविरूद्ध कलम ३७९, १०९ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला असुन गुन्हयाचा पुढील तपास सफौ. सुनिल मिश्रा मो. नं. ९९२३६९४४६७ हे करीत आहे.

## रेती चोरी करणाऱ्या आरोपीवर कारवाई

**पो.स्टे. केळवद** :— अंतर्गत १० किमी अंतरावर खाणगाव शिवारातील परसोडी फाटा शिवार येथे दिनांक १३/०९/२०२३ चे ०२.०० वा. ते ०२.१५ वा. दरम्यान आरोपी नामे— मंगेश मधूकर उईके, वय ३० वर्ष रा. नंदापूर ता. सावनेंर याने आपले ट्रॅक्टर क्र. एम. एच.— ४०/बी. जे.— ५३१६ मध्ये विनापरवाना रॉयल्टी ट्रॅक्टर ट्रॉलीमध्ये १ ब्रास रेती किंमती ५०००/— रू. चोरून नेतांना मिळुन आल्याने त्यांचे कडून ट्रॅक्टर क्र. एम. एच.— ४०/बी जे —५३१६ व ट्रॅक्टर ट्रॉली क्र. एम. एच.— ४० सी एच ०५४५ किंमती ६,००,०००/— रू व १ ब्रास रेती किंमती ५०००/— रू असा एकूण ६,०५,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी केळवद पोलीसांनी, पो.स्टे. केळवद येथे आरोपीविरूद्ध कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला असुन गुन्हयाचा पुढील तपास सफौ. किशोर ठाकरे, मो. क्र. ८००७४९२६५६ हे करीत आहे.

## विनयभंग

**पो.स्टे. सावनेर** :— दिनांक १२/०९/२०२३ चे २०.३० वा. दरम्यान फिर्यादी व आरोपी हे एकाच गावातील राहणारे असुन यातील फिर्यादी आपले घरी हजर असतांना आरोपी नामे— दिलीप भिमराव मानकर, रा. ब्रम्हपुरी वार्ड क्र. ०३ सावनेर हा फिर्यादीचे घरासमोर येवुन फिर्यादीला आवाज देवुन म्हणाला की, तु मला ५००/— रू उसने का दिले नाही. पवन भलावी याला ५०० रू. उसने का दिले या कारणावरून आरोपीने फिर्यादीला अश्लील शिवीगाळ केली व फिर्यादीचे कमरेत हात टाकुन घट्ट मिठी मारून विनयभंग केला

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३५४, २९४ भा.द.वी कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास सपोनि. मंगला मोकासे पो.स्टे. सावनेर या करीत आहे.

## घरफोडी

**पो.स्टे. रामटेक** :— अंतर्गत साटक येथे दिनांक १३/०९/२०२३ चे १०.३० वा. ते ११.३० वा. सुमारास यातील फिर्यादी सुरचंद महादेवजी कुंभलकर, वय ५४ वर्ष, रा. साटक ता. पारशिवनी हे दि. १३/०९/२०२३ रोजीचे ०८/३० वा. गावातच एल. आय. सी. चे कामाकरीता गेले असता दोन्ही मुले शिक्षणाकरीता रामटेक येथे गेले असता १०/१५ वा. फिर्यादी यांची पत्नी हि १०/१५ वा. दरम्यान घराला कुलुप लावुन शेतामध्ये काम करणेसाठी गेली. लहान मुलगा रजत हा ११/१५ वा. दरम्यान घरी परत आला असता त्याला घराचे कुलुप तुटलेले दिसले म्हणुन त्याने फोन करून फिर्यादिला सांगीतले असता फिर्यादी यांनी घरी जावुन पाहिले असता दरवाजा ढकलुन पाहिला असता घरातील कपाटाचे लॉक तुटलेले दिसले व उघडे दिसले तसेच कपडे खाली पडलेले दिसले. कपाटाचे लॉकर उघडुन पाहिले असता लॉकरमध्ये ठेवलेले काळया रंगाचे डब्बीमधील कानातील नेकलेस पॅटर्न सोन्याचे वजन ०६ ग्रॅम किंमती ३६,०००/— रू. व नाकातील खडा किंमती ३०००/— रू. असा एकुण ३९,०००/— रूपयाचा मुद्देमाल आरोपी १) तन्वीर युनीस कुरेशी, वय २६ वर्ष २) स्वप्नील मारोती मौजे, वय २५ वर्षे, दोन्ही रा. वार्ड क्र. ०४ धापेवाडा ता. कळमेश्वर जि. नागपूर यांनी दिवसा घरात घुसुन घर फोडुन चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीतांविरुध्द कलम ४५४, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोहवा/१८४० अमोल इंगोले मो. नं. ८८३०६२१२३३ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर